# <u>व्याख्यान ''सुंदर मी होणार''</u>

दिनांक :- १२.९.०९

## <u>वक्ती :- सौ. धनश्री लेले</u>

एका बाळबोध प्रश्नाने सौ. धनश्री लेले यांना ''सुंदर मी होणार'' या विषयावर विचार करण्यास प्रवृत्त केले.

एकदा वर्तमानपत्रात छापून आलेला '' भारत सुंदरी'' स्पर्धेतल्या स्पर्धकांचा फोटो पाहून सौ. लेले ह्यांना त्यांच्या मुलीने प्रश्न विचारला ''आई, ह्या सर्वजणी कोण आहेत?'' तेव्हा त्यांनी उत्तर दिले ''बेटा, ह्या भारतातल्या सर्वांत सुंदर मुली आहेत''. आईचे हे उत्तर ऐकून त्या छोट्याश्या मुलीला आणखीन एक प्रश्न पडला आणि तिने विचारले ही मुकुट घातलेली मुलगी कोण आहे? तेव्हा त्यांनी तिला सांगितले ''ही त्यांच्यातली सर्वांत सुंदर मुलगी आहे.'' आईचे हे उत्तर ऐकून ती पट्कन म्हणाली, ''मग मी पण सुंदर होणार.''

हा एक छोटासा प्रसंग सौ. लेले ह्यांना एका विषयाचा आशय देऊन गेला.

अतिशय सुंदर, सोप्या, सरळ भाषेमध्ये सौ. लेले ह्यांनी विचार, उच्चार आणि आचार ह्यांचा त्रिवेणी संगम साधून एखादी व्यक्ती कशी सुंदर होऊ शकते हे प्रेक्षकांसमोर मांडले. त्यांनी दिलेल्या छोट्या छोट्या उदाहरणांनी आणि संदर्भांनी हे व्याख्यान अविस्मरणिय झाले.

## <u>सौंदर्याचा पहिला सिध्दांत : विचार</u>

सौंदर्याचा पहिला सिध्दांत जो सौ. लेले ह्यांनी मांडला तो होता ''विचार''. सुंदरता ही माणसाच्या विचारात असते. सुविचाराचा माणूस हा आपोआपच इतरांपेक्षा प्रफुल्लीत आणि तेजस्वी दिसतो. शारिरीक सौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्य हे जास्त महत्वाचे असते.

**उदाहरण - १**

एकदा सौ. लेले ह्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीला जाण्याची आणि हा सोहळा जवळून पाहण्याची संधी मिळाली. प्रत्येक दृश्य टिपता यावं यासाठी त्यांनी सर्वात लवकर जाऊन राजपथाच्या जवळची जागा मिळवली. एक एक करुन सर्व मंत्र्यांच्या गाड्या येत होत्या. प्रत्येक मंत्री आपल्या गाडीमधून उतरल्यावर सर्व प्रेक्षकांना हात हलवून प्रतिसाद देत होते. पण सर्वांच्या नजरा आतुरल्या होत्या त्या राष्ट्रपतींच्या गाडीसाठी. आणि मग तो क्षण आला जेव्हा डॉ. अब्दुल कलाम यांची गाडी राजपथावर आली. सुरक्षिततेची पर्वा न करता त्यांनी गाडीच्या काचा खाली केलेल्या होत्या. गाडीतुन उतरुन प्रसन्न हास्याने हात हलवत

सर्वांच्या स्वागताला ते सतत प्रतिसाद देत होते. त्यांच्याकडे पाहत एक परदेशी महिला उत्स्फुर्तपणे म्हणाली, "How Handsome he is"! तेव्हा सौ. लेले उद्गारल्या "Yes Indeed".

कारण डॉ. अब्दुल कलाम यांच्या चेहऱ्यावरचं तेज हे त्यांच्या विचारांच, ज्ञानाचं तेज होतं.

**उदाहरण - २**

स्वातंत्र्य चळवळीच्या वेळेस सर्व लोक महात्मा गांधीजींच्या भाषणासाठी आधीपासूनच गर्दी करत. ते फक्त त्यांचे भाषण ऐकण्यासाठी नव्हे तर त्यांना जवळून पाहता यावे यासाठी. ऐवढे उच्च विचार असणारी व्यक्ती दिसते कशी ? ह्याबद्दल त्यांच्यात कुतूहल असे.

गांधीजी ही एक व्यक्ती नसून ती एक शक्ती, एक विचारश्रेणी आहे. त्यांच्या चेहऱ्यावर त्यांच्या प्रभावी विचारांची लाली होती आणि म्हणूच ते इतरांना सुंदर भासायचे.

विचार कसे असावेत ह्याबद्दल सांगतांना सौ. लेले ह्यांनी चार विचार प्रकारांवर भर दिला. ''विचार'' या शब्दांमध्ये सुध्दा ''चार'' चा उल्लेख आहे.

वि + चार

1) विचार तक्रारात्मक नसावेत

2) विचार सकारात्मक असावेत

3) विचार वेगळे असावेत

4) विचार निराशावादी नसावेत

1) **विचार तक्रारात्मक नसावेत :-** आपल्याला नेहमीच काहीना काही तक्रार करण्याची सवय असते आणि समोरच्या व्यक्तीलाही तक्रार ऐकण्यातच रस असतो.

**उदाहरण – ३**

समजा मी म्हटलं की सकाळी येताना लोहपथगामिनीला (ट्रेनला) अजिबात गर्दी नव्हती आणि मला चक्क डोंबिवली गाडीत खिडकीच्याजवळ बसायला जागा मिळाली. तर सर्वांच्याच भुवया उंचावतील. पण मी जर असं म्हणाले की ''काय गर्दी होती गाडीला! कशीबशी मी आत शिरु शकले.'' तर लगेचच समोरची व्यक्ती क्षणाचाही विलंब न करता म्हणेल ''आहो, आता तर ठीक आहे, पण मी येते तेव्हा..... ''

या प्रसंगावरुन सहज लक्षात येते की माणूस आपल्याकडे 'काय आहे' हे पाहण्यापेक्षा आपल्याकडे 'काय नाही' आहे हेच तुणतुणे वाजवण्यात कायम धन्यता मानत असतो.

पण या जगात अशा अनेक व्यक्ती आहेत ज्यांना देवाने शारिरीक अपंगत्व दिले आहे, पण तरीही त्या मनाने अपंग नाहीत.

**उदाहरण – ४**

'The left leg' :- ह्या चित्रपटात अशाच एका मुलाची सत्यकथा मांडण्यात आली आहे. या मुलाचा फक्त डावा पायच हलू शकत होता पण याच डाव्या पायात त्याच्या आईने जगण्याची उमेद त्याला दाखविली. याच एका पायाने त्याने चित्र काढली, लिखाण केले, त्याला जगण्याची नवी दिशा मिळाली.

आपल्याकडे काय नाही यावर चिंता करण्यापेक्षा जे देवाने दिले आहे याचा पूरेपूर उपयोग करुन त्याचे चीज केले पाहिजे.

**उदाहरण – ५**

'Why Not I' ह्या पुस्तकातही लेखिका वृंदा भागवत ह्यांनी अशाच एका मुलीची कथा मांडली आहे. डॉक्टरांच्या चुकीमुळे अंधत्व आलेली देऊ कुठेही खचली नाही. नव्या उमेदीने आणि उत्साहाने ती उभी राहिली. आपल्या मेहनतीने तिने दहावीच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. नंतर एका जागतिक परिसंवादात भारतीयांचे प्रतिनिधीत्व करुन तिने सर्व जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले. माननीय राष्ट्रपती प तिभा पाटील ह्यांनी तिच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि तिच्या जिद्दीचे कौतुक केले.

पण आपण मात्र सर्व असूनही फक्त तक्रारच करत असतो.

2) **विचार सकारात्मक असावेत :-** मनुष्याचे विचार हे नेहमी सकारात्मक असावेत. ते कधीही नकारात्मक असू नयेत. नवी उमेद, नवी आशा नवी उमंग त्यात असावी. पण आपले विचार हे नेहमी निराशावादी, नकारात्मक, आशाहीन असतात. हेच आपल्याला दैनंदिन वृत्तपत्रांमधेही दिसते.

**उदाहरण – ६**

रोज सकाळी वृत्तपत्र उघडले की त्यात केवळ नकारात्मकच बातम्यांचा भडिमार केलेला असतो. खून, चोरी, बलात्कार, जाळपोळ ह्या बातम्यांनी वृत्तपत्रांचे पहिले पान खचाखच भरलेले असते. कधी कधी तर आपल्यालाच प्रश्न पडतो कि 'या देशात काहीच चांगलं घडत नाही का? जगातील माणूसकीच नष्ट तर होत चालली नाही ना?

दिवसाची सुरुवातच अशा नकारात्मक विचारांनी झाली तर चांगले आशावादी विचार येणार कुठून? या सर्व वृत्तपत्रांनी किमान एखादा तरी रकाना चांगल्या बातम्यांसाठी राखून ठेवला पाहिजे.

सकारात्मक विचार करतांना मनुष्याला 'तो दृष्टीकोन' असण्याची गरज असते.

**उदाहरण – ७**

एकदा रविंद्रनाथ टागोर आपल्या दालनात अस्वस्थपणे फेऱ्या मारत होते. बराचवेळ प्रेक्षकाची भुमिका घेतल्यानंतर न राहवून त्यांच्या शिष्याने त्यांना विचारले, ''गुरुजी, काय झाले? तुम्ही इतके अस्वस्थ का दिसता?" तेव्हा गुरुजी उद्गारले, ''अरे आज सुर्योदय पहायचे राहून गेले". त्यांच्या या उत्तराने शिष्य गोंधळला. ''त्यात काय झाले गुरुजी उद्या पहा" असं तो निरागसपणे म्हणाला. गुरुजी तेव्हा त्याला म्हणतात ''अरे आजचा सुर्य नवा, ती पहाट नवी, ती आकाशातली पक्षांची रांग नवी, तो सकाळचा लालिमा नवा."

**उदाहरण – ८**

एकदा सौ. लेले ह्यांना एका अंध शाळेत व्याख्यानासाठी आमंत्रण आले. त्यांच्या मनात सहजच एक विचार डोकावला. ''अंध व्यक्तीच्या शाळेत कुठलाही पोषाख घातला तरी चालेल. त्यांना कुठे दिसते आपण काय घातले आहे ते," पण तेथील एका प्रसंगाने त्यांचे विचार पूर्णपणे बदलले. व्याख्यानाच्या वेळेस एक अंध महिला त्यांच्याजवळ आली. तिच्या हातात एक साडी होती. ती त्यांना म्हणाली ''ह्याचा जरा रंग सांगता का? लेलेंना वाटले की ही स्त्री आंधळी आहे. हिला काय करायचे रंग समजून आणि मी कोणताही रंग सांगितला तरी हिला कुठे दिसते. त्या तिला म्हणाल्या ''अगं तुला रंग कशासाठी हवे आहेत? त्यावर ती स्त्री म्हणाली, ''मला त्याच रंगसंगतीचे दागिने घ्यायचे आहेत". ह्या वाक्याने त्या अंतर्मुख झाल्या. ही अंध स्त्री कुठलेही रंग दिसत नसतांना रंगसंगतीचा, आपल्या दिसण्याचा विचार करते. त्यासाठी तिला डोळ्याची गरज नव्हती. ते पाहण्यासाठी तिच्याकडे 'ती दृष्टी' होती.

**उदाहरण – ९**

एकदा लोहपथगामिनी मध्ये (ट्रेनमध्ये) एक अंध मुलगा सुरेल गाणं गात होता ''सांज ये गोकुळी, सावळी, सावळी....." या गाण्यात संध्याकाळचे अतिशय सुरेख वर्णन केले आहे. उतरताना न राहवून सौ. लेले ह्यांनी त्याला विचारले ''अरे तू कधी संध्याकाळ पाहिली आहेस का? तो मुलगा म्हणाला ''डोळयांनी नाही पण मनाने पाहिली आहे."

किती सुदंर हा विचार. एखादी गोष्ट पाहण्यासाठी डोळ्याची गरज नसते पण ती अनुभवण्यासाठी गरज असते ती त्या दृष्टीची, त्या नजरेची.

## ३) विचार वेगळा असावा

त्याचत्याच विचारांच्या भोवऱ्यात न अडकता, काहीतरी नविन करण्याचा विचार माणसाने केला पाहिजे. नवीन विचार हा कोणालाही सुचू शकतो. त्याला शिक्षणाची अट नाही. समाजाचे बंधन नाही.

**उदाहरण – १०**

एक ग्रामीण स्त्री पंढरीला विठोबाच्या दर्शनाला गेली. पण मंदिराच्या गाभाऱ्यात न जाता ती दरवाज्याजवळ उभी राहून म्हणते ''ईटेवरी उभा, युगे झालीत अठ्ठाईस, कुणी म्हणंना कसं माझ्या ईठ्ठलाला, खाली बस ?''

'खरंच आपल्याला असा विचार कधी सुचलाच नाही'.

**उदाहरण – ११**

सौ. लेले ह्यांचे यजमान श्री. अमोल लेले, एका हिऱ्याच्या कारखान्यात अधिकारी आहेत. हिऱ्याला पैलू पाडण्याच्या यंत्रणांमुळे हिऱ्यांना चरे पडत. त्यामुळे त्यांच्या किंमती कमी होत होत्या. सर्वांनी यावर खूप विचार केला. पण काही तोडगा सापडत नव्हता. पण काही दिवसांनी त्यांच्या कारखान्यातील एका कामगाराने पैलू पाडलेल्या हिऱ्यावर काहीही चरे पडत नसल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यांनी त्याला बोलवले, मग गौप्यस्फोट करत तो म्हणाला की ''चरे पडू नये म्हणून मी Fair & Lovely यंत्रांना लावली. एकदा कारखान्यातून घरी गेलो तेव्हा दुरदर्शनवर Fair & Lovely ची जाहिरात होती. ती पाहून माझ्या मनात चट्कन विचार आला. जर Fair & Lovely Cream लावल्यावर चेहऱ्यावरचे डाग जातात तर मग हिऱ्यांवरचेही डाग जातील आणि म्हणून मी यंत्राला Fair & Lovely लावले, मग हिरे ही डागमुक्त झाले''. त्यादिवसापासून प्रत्येक यंत्राजवळ एक Fair & Lovely असतेच आणि त्या कामगाराला नोकरीत बढती मिळाली.

एका वेगळ्या विचाराने सर्व दृश्यचं बदलून टाकले.

**उदाहरण – १२**

एकदा एक कंपनीत अंतिम चाचणीत तीन मुलांची निवड करण्यात आली. ही तीनही मुले शिक्षणाने, अनुभवाने, तोलामोलाची होती. त्यामुळे परिक्षकांना कोणाला निवडावे हा प्रश्न पडला होता. त्यांनी तीनही मुलांनां आपल्या ऑफिस मध्ये बोलवले आणि सांगितले, ''जो मुलगा या खोलीच्या खिडकीमधून उडी मारेल त्यालाच या पदासाठी निवडले जाईल''. मग काय, तिन्ही मुलांना काही सुचेनासे झाले. कारण तो २७ वा मजला होता. त्यातल्या दोघांनी उडी मारण्यास तत्काळ नकार दर्शवला. पण तिसरा मुलगा होकारार्थी मान हलवत खिडकीपाशी गेला. कसाबसा डोळे झाकत तो वर चढला. क्षणभर त्याला गरगरलं आणि त्याने धाडकन ऑफिसच्या आत उडी मारली.

''उडी कुठे मारायची हे काही सांगितले नव्हते''

**उदाहरण - १३**

एकदा IAS पदाच्या निवड चाचणीत एका मुलीला परिक्षकांनी विचारले तुझ्या आयुष्यातील सर्वात पेचात टाकणारा प्रसंग कोणता ? ती पट्कन म्हणाली ''या खोलीत पाच पुरुष आहेत. मी एकटीच मुलगी आणि खोलीचं दार बंद आहे. हाच माझ्यासाठी मोठ्ठा पेचप्रसंग आहे.''

वेगळा विचार हा चट्कन सुचणे हेही तेवढेच महत्वाचे आहे.

**उदाहरण - १४**

शिवाजी महाराजांना जेव्हा पुत्ररत्नाचा लाभ झाला तेव्हा महालात अस्वस्थता पसरली होती. राजाराम पालथे जन्मल्यामुळे सर्वच जण चिंतेत होते. कारण पालथे जन्मलेले मूल अपशकूनी असते असा समज होता. पण जेव्हा महाराजांच्या कानावर ही बातमी गेली तेव्हा ते उत्स्फुर्तपणे म्हणाले ''काही काळजी करु नका, सारी पृथ्वी पालथी घालेल''.

ह्या एका वेगळ्या विचाराने सर्वांचेच नैराश्य दूर झाले. आणि एक नवीन उमेद जागी झाली.

**उदाहरण - १५**

एकदा एका व्यक्तीने आपल्या बागेत सर्व थोर राजांचे पुतळे उभारले. ते पुतळे पाहताना एका माणसाच्या लक्षात आले की यात सिकंदराचा पुतळा नाही. तो सिकंदराजवळ गेला व म्हणाला ''सर्व पुतळ्यांत आपला पुतळा का नाही ? ''

तेव्हा सिकंदर त्याला म्हणाला ''सर्वांचे पुतळे असूनही माझा पुतळा का नाही हा प्रश्न तुम्हाला पडला आणि तुम्ही माझ्याबद्दल विचार करण्यास प्रवृत्त झालात, यातच सर्व आले. ''

मनुष्य हा त्याच्या कतृत्वाने ओळखला जातो, उभारलेल्या पुतळयांनी नव्हे.

सिकंदराचे नाव काढलं की आपल्याला त्याचा चेहरा, रंग कदाचित आठवणार नाही पण आठवतो तो त्याचा पराक्रम आणि कतृत्व. इतिहासाच्या पुस्तकातील ती धूसर प्रतिमा सुध्दा त्यांच्या विचाराने, शक्ती, शौर्य आणि क्षमतेने लक्षात राहाते.

**४) विचार निराशावादी नसावेत.**

याचा काय उपयोग, हे कशासाठी करायचे असे विचार जेव्हा एखाद्याच्या मनात डोकावतात तेव्हा त्याला खरतर आत्मचिंतनाची गरज असते. कारण या जगात असे काहीच नाही ज्याचा काही उपयोग नाही.

**उदाहरण – १६**

एकदा एक राजा आपल्या प्रधानाला सांगतो, ''डास आणि कोळी राज्यात भरपूर झाले आहेत, त्याचा काहीही उपयोग नाही तेव्हा त्यांचा बंदोबस्त करा.'' प्रधान होकारार्थी मान हलवतो.

काही दिवसांनी राजा सैनिकांसह शिकारीला गेला होता. पण सावजाचा पाठलाग करताना तो खूप पुढे निघून गेला आणि त्याच्या बरोबरचे सैन्य मागे राहिले. राजा त्या घनदाट जंगलात एकटाच सापडलेला असताना त्याच्या लक्षात आले की त्याचे शत्रू त्याच्या मागावर आहेत. तेव्हा जवळच त्याला एक गुहा दिसली. त्या गुहेच्या तोंडावर अनेक कोळीष्टके जमली होती. असंख्य डास तिथे वस्तीला होते. पण राजाकडे दूसरा पर्याय नव्हता तो त्या गुहेत शिरला. कोळी व डास त्याला चावत होते पण तो तसाच तिथे बसून राहिला. शत्रूचे सैनिक गुहेजवळ आले. इतके कोळीष्टके जमलेल्या असंख्य डासांनी भरलेल्या गुहेत राजा असूच शकत नाही असा समज करुन त्या गुहेत न शिरताच ते दुसऱ्या दिशेला निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजा गुहेतुन बाहेर आला. जरी त्याच्या अंगावर डास चावल्यामुळे असंख्य फोड आले असले तरी कोळी डासांचाही उपयोग असतो या गोष्टीचा त्याला प्रत्यय आला.

**उदाहरण – १७**

संपूर्ण विद्या ग्रहण केल्यावर एका शिष्याने आपल्या गुरुला गुरुदक्षिणा विचारली तेव्हा गुरु म्हणाले ''मला काही नको''. पण तरिही शिष्याने आग्रह धरला. त्याच्या आग्रहाखातर गुरुजी त्याला म्हणाले ''बाळ, एक वनस्पती जी मला आजपर्यंत सापडली नाही ती तु माझ्यासाठी शोधून आण''. गुरुजींनी त्याला वनस्पतीचे गुणधर्म व उपयोग समजावून सांगितले. तो शिष्य लगेच वनस्पतीच्या शोधासाठी निघाला. ६ महिने निरंतर प्रयत्न करुनही त्याला त्या विशिष्ट वनस्पतीचा शोध लागला नाही. तेव्हा तो आश्रमाकडे निराश मनाने परतला.

त्यावेळेस राजा गुरुंना राजवैद्य होण्याबद्दल प्रस्ताव मांडत होता. तेव्हा गुरु राजाला म्हणाले ''राजन, मी या आश्रमामधून कित्येक काळ बाहेर पडलो नाही. त्यामुळे मला सर्व वनस्पतींची पूर्ण माहिती नाही. पण हो, माझा एक शिष्य जो आताच आपल्या नगरीची पूर्ण पाहणी करुन आला आहे तो निश्तिच या पदासाठी योग्य आहे.''

शिष्याला काही कळेनासे झाले तो गुरुंना म्हणाला ''गुरुजी मला माफ करा आपण सांगितलेली वनस्पती मला मिळाली नाही'' तेव्हा गुरुजी त्याला म्हणाले. ''अरे बाळ तू सर्व राज्य पालथे घातलेस, पण आपल्या आश्रमात पाहिलेस का ?''

शिष्याने लगेचच आश्रमामध्ये शोध घेतला. गुरुंच्या पर्णकुटीच्या परसांतच त्याला ती वनस्पती सापडली. तेव्हा इतर शिष्यांनी त्याला विचारले, ''जर ही वनस्पती इथेच आश्रमात होती तर गुरुजींनी तुला का सांगितले नाही ? तुझे ६ महिने वाया गेले''.

मग त्याच्या लक्षात आले की ही वनस्पती शोधण्यासाठी त्याला सर्व वनस्पतींचे गुणधर्म आणि उपयोग पडताळावे लागले. त्याची मेहनत वाया गेली नाही तर त्याच्या ज्ञानात अधिक भर पडली.

**उदाहरण – १८**

एडिसनलाही विजेचा शोध लावण्यासाठी ९९० धातूंचे परिक्षण करावे लागले. कोणी एकाने त्याला सहज म्हटले की ''तुमची ९९० धातूंची परिक्षण करण्याची मेहनत फुकट गेली." पण त्यावर तो म्हणाला ''माझी मेहनत वाया गेली नाही. विजेचा शोध लावण्यासाठी ज्या ९९० धातूंचे परिक्षण करावे लागले, त्यामुळे मला त्यांचे गुणधर्म समजले".

या सर्व उदाहरणातून एकच गोष्ट स्पष्ट होते की कुठलीही गोष्ट वाया जात नाही. कुठलीही गोष्ट निरुपयोगी नसते केव्हा न् केव्हा कुठे न कुठे, कधी न् कधी तिचा आपल्याला उपयोग होत असतो.

***<u>सौंदर्याचा दूसरा सिध्दांत : उच्चार</u>***

त्यानंतर आणखीन एक धागा पकडत सौ. लेले ह्यांनी 'उच्चार' या महत्वाच्या विषयावर प्रकाश टाकला.

उच्चार म्हणजेच आपले मत मांडण्याची कला. प्रत्येक व्यक्तीचा उच्चार, निर्भीड, धाडसी आणि स्पष्ट असावा. कुठल्याही विषयावर बोलताना ज्ञान, भान व कान ठेवून बोलण्याची गरज आहे असे सौ. लेले ह्यांनी नमूद केले.

**उदाहरण – १९**

आपण खूप वेळा पाहतो कि लोक राजकीय नेत्यांबद्दल नेहमीच अपशब्द बोलत असतात पण नेते व पुढारी समोर आले की त्याची प्रशंसा करतात. त्यांच्यासमोर त्याची निंदा करण्याचे धाडस, धैर्य कोणीही दाखवित नाही.

**उदाहरण – २०**

बरेच लोक शब्दाचा खरा अर्थ न जाणताच तो वापरतात. 'काय भयंकर मज्जा आली ।' मज्जा कधी भयंकर असू शकते का ? एकदा त्या दूरदर्शनवरील कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाला गेल्या होत्या. कार्यव ्रम संपताना निवेदिका (Anchor) म्हणाली की आता कार्यक्रमाचे संगोपन आपण यांच्या गाण्याने करुया.

‘संगोपन’ म्हणजे मुलांना वाढविणे. कार्यक्रमाची ‘सांगता’ म्हणायच्या ऐवजी संगोपन हा किती चुकीचा शब्दप्रयोग आहे.

काही हिंदी दूरदर्शन वाहिन्यांवर ‘दर्शकोंसे अनुरोध है कि.........‘ हे वाक्य सर्रास ऐकू येते. पण दर्शक म्हणजे जो दाखवितो तो. त्यामुळे समोर बसलेले श्रोते हे दर्शक नसून प्रेक्षक आहेत आणि रंगमंचावरिल कलाकार दर्शक आहेत हे आपल्याही लक्षात येत नाही.

**उदाहरण – २१**

एकदा बाणभट्ट एक काव्यसंग्रह लिहित होते. वय वाढल्याने हा काव्यसंग्रह पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या मुलांपैकी एकाकडे सोपवावी असे त्यांनी ठरविले. त्यांनी आपल्या मुलांची परिक्षा घेण्याचे ठरविले. त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना बोलवले व दाराबाहेर पडलेल्या ओंडक्यावर काव्य रचायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी दोन्ही कविता बघून बाणभट्टांनी काव्य पूर्णत्वाची जबाबदारी आपल्या धाकट्या मुलाकडे सोपविली. हे पाहून मोठ्ठ्या मुलाला आश्चर्य वाटले व त्यांनी त्याबद्दल बाणभट्टांना विचारले तेव्हा त्यांनी त्याला स्वतःच ते दोन्ही काव्य वाचावयास सांगितले. पहिल्यामुलाने लिहिले होते, ‘‘सुकलेला लाकडाचा ओंडका पडलेला आहे,’’ पण दूसऱ्याने लिहिले होते की ‘‘निर्जीव असा वृक्षाचा भाग इथे विराजमान झाला आहे.’’

बाणभट्ट यांच्या पहिल्या मुलाचा उच्चार हा व्यवहारदक्ष, नकारात्मक, रोखठोक, कठोर वक्तव्य करणारा होता पण दूसरा मुलगा सकारात्मक, सहृदय, मृदु, कल्पक आणि दूरदृष्टीचा होता. म्हणून तो काव्यरचना पूर्ण करण्याची जबाबदारी समर्थपणे पेलू शकत होता.

***<u>सौंदर्याचा तिसरा सिध्दांत : आचार</u>***

सौ. लेले गंमतीने म्हणतात जो विचार करतो तो विचारी आणि जो आचार करतो तो आचारी. पण तसे नाही जो विचार करतो, तसा बोलतो आणि बोलतो तसा वागतो तो आचार्य. मनुष्याच्या जे मनात, हृदयात असते तेच त्याच्या ओठांवर असते.

**उदाहरण – २२**

एकदा बहिणाबाईंचा मुलगा घराबाहेर अंगणात त्याच्या मित्रांबरोबर खेळत होता. खेळता खेळता त्यांच्यात भांडणाला सुरुवात झाली. बहिणाबाई हे सर्व घरातूनच पाहत होत्या. नंतर त्यांच्यातील भांडणे विकोपाला जावून त्यांच्या मुलाने शिवी दिली. ती शिवी ऐकताच बहिणाबाई चुलीतले लाकूड घेवून धावत बाहेर आल्या. त्यांचा मुलगा आईला पाहून खूप घाबरला त्याला वाटले आता आई आपल्या जिभेला चटका

देणार. पण बहिणाबाईंनी त्याच्या पोटाला चटका दिला. त्यावेळी त्यालाही कळले नाही की आईने आपल्याला पोटावर चटका का दिला ?

मोठा झाल्यावर त्याला कळले कि ''जे पोटात ते ओठात'' म्हणून जिभेला चटका न देता. ज्या पोटातून हे बाहेर पडले त्या पोटाला आईने चटका दिला.

सौ. लेले ह्यांनी 'जि' चा अनुप्रास वापरून हे चार 'जि' प्रत्येक मनुष्याच्या यशाचे आधारस्तंभ आहेत हे सांगितले.

जि वंतपणा
जि व्हाळा
जि ज्ञासा
जि द्द

**जिवंतपणा :-** सौ. लेले म्हणतात 'माणसाने शेणाच्या किंवा चिखलाच्या गोळयाप्रमाणे असू नये तर त्याने एका रबरी चेंडु प्रमाणे असावे. चिखलाचा गोळा करुन खाली टाकल्यावर तो इतरत्र विखुरतो पण रबरी चेंडू तितक्याच आवेशाने पुन्हा वर उसळतो. माणसाने ही असेच असावे.

**जिव्हाळा :-** माणसाने एखाद्या कामामध्ये एकरुप होणे हे खूप महत्वाचे आहे एकरुपता आणि आत्मीयता हाच यशाचा पाया आहे.

**जिज्ञासा :-** जिज्ञासा म्हणजे कायम शिकण्याची वृत्ती. शिक्षण हे अथांग पसरलेल्या समुद्रासारखे आहे. माणूस जन्मभर शिकत राहिला तरी तो या महासागराचे काही थेंबच वेचू शकतो.

शिक्षक आणि शिष्य हे दोन्ही कायम विद्यार्थीच असतात.

महात्मा गांधीजींनी म्हटलेच आहे ''जगा असे कि तुम्ही उद्याच मरणार आहात, शिका असे कि तुम्ही अनंतकाळ जगणार आहात''.

**जिद्द :-** दृढ निश्चय देखील यशाची गुरुकिल्ली आहे. जिद्द असेल तर माणूस आकाशाला गवसणी घालू शकतो.

शेवटी व्याख्यानाची सांगता करताना सौ. लेले म्हणाल्या कि विचार, उच्चार आणि आचार हेच सौंदर्याचे सार आहे. या तिघांच्या मधुर मिलन मिलापातच सौंदर्याचे खरे रहस्य दडले आहे. सुविचार, स्पष्ट उच्चार आणि तसाच आचार ह्यानेच मनुष्य चिरंतर सुंदर दिसू शकतो.

म्हणूनच कि काय कवी म्हणतात,

**''सुंदर मी होणार,''.**
**''सुंदर मी होणार,**
**मरणाने जगणार!''.**